**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती २०२५-२६**

**द्वारा: महात्मा फुले नूतन महाविद्याल मिरजगाव**

ता. कर्जत जि. अहिल्यानगर ४१४४०१ इमेल:nagarzone2018@gmail.com

| सचिव | अध्यक्ष |
|---|---|
| **डॉ. राजेंद्रकुमार सुखदेव देवकाते**<br>इमेल :rsdevkate1431@gmail.com<br>मो. नं. ८८३०५४५१४१ ,९६३७१२९५९२ | **प्राचार्य डॉ. तानाजी हनुमंत जाधव**<br>इमेल: thjadhav444@gmail.com<br>मो.नं.९९२१११६५४८ |

| | |
|---|---|
| **जा.क्र. अजिक्रीवि- २३/ २०२५-२६** | **दिनांक:०८/०९/२०२** |

**प्रति,**
**मा. प्राचार्य / मा. संचालक,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न**
**अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.**

**विषय : खेळाडूंच्या online पात्रतेबाबत (Online Sports Eligibility) दि. १०.०९.२०२५ पर्यंत सूट देनेबाबत..**

**महोदय,**

सदर विषयानुसार आपणास पुन्हा कळविण्यात येते की, अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागीय समितीचे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले असून त्यासंबधीचे पत्रके यापूर्वीच पाठविण्यात आले आहेत.

परंतु गेली चार दिवस विविध कारणाने महाविद्यालय अथवा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सुट्टी असल्या कारणाने **Online Sports Eligibility करण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे अहिल्यानगर जिल्हा आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेमध्ये अनेक महाविद्यालयाच्या खेळाडू विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास अडचणी निर्माण होत आहे. त्या अनुषंगाने असा निर्णय घेण्यात आला आहे की, सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रथम वर्षातील प्रवेशित खेळाडू विद्यार्थांना दि. १०.०९.२०२५ पर्यंतच ऑफ लाईन (OFFLINE ) फॉर्म सादर करून स्पर्धेत सहभागी होण्यात येईल. त्यासाठी त्यांना** खालील प्रमाणे बाबींची पूर्तता करावी.

१. ऑक्टोबर २०२४, फेब्रुवारी २०२५ आणि पुरवणी परीक्षा २०२५ मध्ये बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालेले आणि प्रथम वर्षात पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या परंतु काही कारणास्तव अद्याप त्यांच्या पात्रता प्रक्रिया पूर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांना, संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे हमी पत्र सादर केल्यास, स्पर्धेत सहभागी होण्याची तात्पुरती परवानगी देण्यात येईल.
२. ऑक्टोबर २०२४ आणि मार्च / एप्रिल २०२५ मध्य पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले आणि प्रथम वर्षात पदवीत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या परंतु काही कारणास्तव अद्याप त्यांच्या पात्रता प्रक्रिया पूर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांना, संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे हमी पत्र सादर केल्यास, स्पर्धेत सहभागी होण्याची तात्पुरती परवानगी देण्यात येईल.

या संदर्भात सर्व महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, संबंधित विद्यार्थ्यांकडे खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

१. प्रवेश पावती (Admission Receipt) २. महाविद्यालयीन ओळखपत्र (College Identity Card)

वरील सूचना काटेकोरपणे पाळण्यात याव्यात. आंतर विभागीय स्पर्धेत होण्या पूर्वी संबंधित विद्यार्थ्यांची पात्रता (Eligibility) करणे गरजेचे आहे, अन्यथा संबंधित विद्यार्थ्याला स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

**दि. १०.०९.२०२५ नंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्वीची ऑफ लाईन (Offline / Performa ) क्रीडा पात्रता फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत याची आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी व मान्यताप्राप्त संस्थांनी नोंद घ्यावी.**

**तसदीबद्दल क्षमस्व** **आपले विश्वासू**

**डॉ. राजेंद्रकुमार सुखदेव देवकाते**
**सचिव**

**प्राचार्य डॉ. तानाजी हनुमंत जाधव**
**अध्यक्ष**